संदेशाचा उत्तरलेख

# विलिनीकरणानंतरचा प्रवास

## जेव्हा पाण्याला आपण हायड्रोजन होतो, याचा विसर पडतो



पूज्य दाजी

यांनी 70 व्या जन्मदिनानिमित्ताने दिलेल्या

28 सप्टेंबर 2025, कान्हा शांतिवनम्



## संदेशाचा उत्तरलेख

# विलिनीकरणानंतरचा प्रवास

## जेव्हा पाण्याला आपण हायड्रोजन होतो, याचा विसर पडतो

प्रियजनहो,

आध्यात्मिक प्रवासामध्ये एक मूलभूत विरोधाभास असतो: आपण ज्याला अंतिम ध्येय समजत असतो, ती तर प्रत्यक्षात, खऱ्या आध्यात्मिक प्रगतीची, केवळ, सुरुवात असते. ही अंतर्दृष्टी, जी सप्टेंबर 2025 च्या भंडाऱ्यामध्ये दिलेल्या संदेशाचा गाभा आहे, ती आपल्याला आध्यात्मिक प्रगती, यश आणि आत्मसाक्षात्काराचे स्वरूप या संदर्भात, आपल्या ज्या काही मूलभूत संकल्पना असतात, त्यांतील सत्य, त्वरित, पडताळून पाहण्यास उद्युक्त करते.

या जगात सर्व जण शेवट काय आहे याबद्दल आसक्त आहेत. आपण असे वागतो जणू पदवीप्राप्ती, निवृत्ती, साक्षात्कार हे शेवटचे टप्पे आहेत. पण निसर्ग आपल्याला काहीतरी वेगळेच दर्शवतो. अंधारात संघर्ष करून मातीतून बाहेर पडून बीजाने आपला प्रवास पूर्ण केला आहे का? नाही, ती तर फक्त सुरुवात आहे. मातीतून उगवणे, हे ध्येय नसते; तर ते पहिले पाऊल असते, अत्यावश्यक असलेले टप्पे पार करण्याकरिता उचललेले - फोटोसिंथेसिस, वाढ, फलधारणा, सावली देणे आणि अखेर, नवीन बियाण्यांसाठी पुन्हा माती बनणे.

**अंधारात संघर्ष करून मातीतून बाहेर पडून बीजाने आपला प्रवास पूर्ण केला आहे का? नाही, ती तर फक्त सुरुवात आहे. मातीतून उगवणे, हे ध्येय नसते; तर ते पहिले पाऊल असते, अत्यावश्यक असलेले टप्पे पार करण्याकरिता उचललेले - फोटोसिंथेसिस, वाढ, फलधारणा, सावली देणे आणि अखेर, नवीन बियाण्यांसाठी पुन्हा माती बनणे.**

बाबूजी जेव्हा म्हणतात कि विलिनीकरण तुमच्यासाठी सुरुवात आहे, त्यांना नेमके हेच म्हणायचे आहे. समुद्रात सामील होण्याचा आनंद साजरा करणारा थेंब, प्रत्यक्षात विलीन झालेलाच नसतो. खऱ्या विलिनीकरणाचा आनंद साजरा करण्यास कोणीही शिल्लक उरतच नसतो. हाच तर, सर्वात मोठा विरोधाभास आहे.

## परिवर्तनामागील विज्ञान आणि तत्त्वज्ञान

मूलभूत रसायनशास्त्रातील गहन धडा विचारात घेऊ: हायड्रोजन वायू अस्थिर, घातक आणि ज्वलनशील असतो; ऑक्सिजन ज्वलनाला पोषक असतो व सर्वकाही

पेट घेण्यास मदत करतो परंतु असे असूनही, जेव्हा त्यांचे मिश्रण बनते, तेव्हा ते विनाशकारी ठरते का? त्यांच्या संयोगाने पाणी तयार होते, जे अवघ्या जीवनाचा आधार असते. परंतु यात गहन सत्य अंतर्भूत आहे: पाण्याला आपण हायड्रोजन होतो, हे आठवत नसते. आता, त्याचे पूर्वीचे स्फोटक स्वरूप अगदी दडपलेल्या प्रवृत्तीच्या स्वरूपातही शिल्लक राहिलेले नाही. हे रूपांतरण इतके संपूर्ण आहे की त्याचे मूळ स्वरूप यापुढे एक संभाव्यता म्हणून सुद्धा अस्तित्वात नाही.

हे आपण आध्यात्मिकदृष्ट्या कसे प्रगत होत जातो, याच्याशी संबंधित आहे. आपण, अनेकदा, आध्यात्मिक प्रगती म्हणजे आपल्या व्यक्तिमत्त्वास, कशाची तरी जोड देणे, जसे नवीन गोष्टी शिकणे किंवा एखाद्या गुणकौशल्यात वृध्दी करणे, असे समजतो. परंतु खरा बदल जणू किमयाच आहे. तुम्ही फक्त तुमच्या सध्याच्या स्वरूपात भर घालत नाही; तुम्ही पूर्णपणे वेगळे काहीतरी बनता जे पूर्णत: वेगळ्या उद्देशाची पूर्तता करते.

**आपण, अनेकदा, आध्यात्मिक प्रगती म्हणजे आपल्या व्यक्तिमत्त्वास, कशाची तरी जोड देणे, जसे नवीन गोष्टी शिकणे किंवा एखाद्या गुणकौशल्यात वृध्दी करणे, असे समजतो. परंतु खरा बदल जणू किमयाच आहे. तुम्ही फक्त तुमच्या सध्याच्या स्वरूपात भर घालत नाही; तुम्ही पूर्णपणे वेगळे काहीतरी बनता जे पूर्णत: वेगळ्या उद्देशाची पूर्तता करते.**

भगवद्गीतेमध्ये स्वधर्म, तुमचे वैयक्तिक कर्तव्य किंवा उद्देश याबद्दल सविस्तर चर्चा आहे. परंतु जेव्हा बदल इतका आमूलाग्र असतो की तुमचा स्वभाव, तुमचा मूलभूत स्वभावधर्मच बदलतो, तेव्हा काय होते? पाण्याचा गुणधर्म हायड्रोजन आणि

ऑक्सिजनसारखा नसून या दोन्हींच्या मिश्रणाने बनलेल्या पाण्याचा धर्म म्हणजे वाहणे, पोषण करणे, शुद्धता, आणि जीवनास आधार देणे होय.

**संदेश:** आपले एका चांगल्या थेंबात रूपांतरण होत नाही. आपण हे शिकतो की आपले खरे स्वरूप कधीच “थेंबपण” नव्हते. आणि ही जाणीव — जरी अत्यंत महत्त्वाची असली, तरी ती आपल्याला फक्त खरे कार्य सुरू करण्यासाठी तयार करते.

या ज्ञानाचा, आपल्या दैनंदिन जीवनावर काय परिणाम होतो? पहिली गोष्ट म्हणजे समस्या आणि आव्हानांकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन बदलतो. जागृत व्यक्ती ट्रॅफिक जॅमकडे स्वतःच्या प्रवासातील अडथळा म्हणून पाहत नाही. ते स्वतःला वाहतूक व्यवस्थेचा एक भाग मानतात आणि याचा प्रभाव त्यांच्या प्रतिक्रियेवर होतो. ते कदाचित वेगळा मार्ग निवडतील, "मला तिथे लवकर पोहोचणे गरजेचे आहे" म्हणून नव्हे, तर एकूणच, वाहतुकीच्या प्रवाहाकरिता ते भल्याचे ठरेल, म्हणून.

हा समज नात्यांमध्ये आमूलाग्र बदल करतो. बहुतेक भांडणे तेव्हाच होतात जेव्हा दोन थेंब वेगवेगळे राहण्याचा प्रयत्न करतात मात्र, त्याच वेळी, एकत्र राहण्याची इच्छा असल्याचाही दावा करतात. परंतु जेव्हा दोघांना उमजते की ते कधीही वेगळे थेंब नव्हते तर सदैव एकाच पाण्याची अभिव्यक्ती होते, तेव्हा त्यांच्यात वेगळेपण उरत नाही.

वैदिक परंपरेत, प्रयत्न आणि कृपाप्रसादाबद्दल सांगितले आहे. विलिनीकरण होण्यापूर्वी, आपण सागर बनण्याचा प्रयत्न करत असतो. विलय झाल्यानंतर, आपल्याला लक्षात येते की आपण सदैव सागरच होतो परंतु थेंब असल्याचे भासवत होतो. पण यानंतर येतो सर्वात आव्हानात्मक भाग: आपण सागर असल्याचे जाणूनही थेंब होणे निवडणे, कोड्यांनी भरलेला एक विरोधाभास.

म्हणूनच  बाबूजी याला सुरुवात असे म्हणतात. एक अभिनेता भूमिकेत हरवून जाऊ शकतो, पण तुम्ही भूमिका साकारत असल्याचे जाणूनही ती पूर्णपणे साकारू शकता का? पूर्णत:  मानवी राहूनही आपण दिव्य आहोत हे जाणणे शक्य आहे का? अमर्यादित दिव्यत्वात स्थित असूनही, शरीर किती मर्यादित आहे हे तुम्हाला जाणवू शकते का?

## मर्यादेतील विवेक

इथूनच तत्त्वज्ञानाचा प्रत्यक्ष जीवनात उपयोग सुरू होतो. पाणी हे त्याच्या पात्राचा आकार घेते  ते त्याला आकार देता येत नाही, म्हणून नव्हे, तर आकारहीन असणे उपयुक्त नाही म्हणून. पाणी पेल्यामध्ये पिण्यायोग्य होते. ते ढगांमध्ये पावसात

**बदलण्याची क्षमताच, आपल्याला समर्थ बनवते.**

**विलिनीकरणानंतर, हा प्रवास म्हणजे मर्यादांना सर्जनशील पर्याय म्हणून पाहायला शिकण्याचा आहे, न की केवळ पाळावे लागणारे नियम म्हणून बघण्याचा. तुमच्या वर्तमान जीवनाचे वर्तमान स्वरूप तुम्हीच निवडले आहे, सक्तीने नव्हे, तर ते व्यापक योजनेशी सुसंगत आहे म्हणून.**

रूपांतरित होते. रक्तवाहिन्यांमध्ये ते स्वत: जीवनच बनते. त्याचप्रमाणे, स्वत:ला बदलण्याची क्षमताच, आपल्याला समर्थ बनवते.

विलिनीकरणानंतर, हा प्रवास म्हणजे मर्यादांना सर्जनशील पर्याय म्हणून पाहायला शिकण्याचा आहे, न की केवळ पाळावे लागणारे नियम म्हणून बघण्याचा. तुमच्या वर्तमान जीवनाचे वर्तमान स्वरूप तुम्हीच निवडले आहे, सक्तीने नव्हे, तर ते व्यापक योजनेशी सुसंगत आहे म्हणून.

“मी विलीन झालो" असा दावा करणारा आध्यात्मिक अहंकार हा सर्वांत घातक सापळा आहे. हे हायड्रोजन आहे जे आपण पाणी असल्याचे भासवत आहे पण तरीही हायड्रोजनच राहते. खऱ्या पाण्याला, आपण काय आहोत, हे सांगण्याची गरज नाही. ते केवळ वाहते, पोषण करते आणि स्वच्छ करते. त्याचे अस्तित्वच त्याचे कथन आहे.

ही सुज्ञता आपल्याला अति-आध्यात्मिक प्रतिमा जपण्याच्या कष्टापासून मुक्त करते. आपण सर्वज्ञ आहोत याचा आव आणण्याची गरज नाही. आपल्या बोलण्यात अस्वाभाविकपणा नसावा. आपण केवळ पाण्यासारखे असावे- सदैव उपस्थित, मदतीसाठी तत्पर आणि परिस्थितीनुरूप जुळवून घेण्यास सक्षम.

## अविरत सेवा

जेव्हा गणित तज्ञांना अनेक अनंतांचा शोध लागला, ज्या प्रत्येकामध्ये इतर सर्व समाविष्ट आहेत परंतु प्रत्येक भिन्न आहे, तेव्हा त्यांनी एका आध्यात्मिक सत्यालाच स्पर्श केला. विलिनीकरणानंतर, प्रवास दीर्घ होण्याचा नाही, तर मर्यादांच्या चौकटीत राहूनसुध्दा, सेवा करण्याचे अनंत मार्ग शोधण्याबद्दलचा आहे.

आपल्या बाळाला पाजणारी माता समर्पकपणे आपल्या कृतीत हे दाखवून देते. एका जीवाची काळजी घेण्यासाठी तिला विश्वाची जाणीव असणे आवश्यक नाही. सामान्य व्यक्तीपासून ते माता होण्यापर्यंतचे तिच्यातील परिवर्तन हे संपूर्ण आणि

जे करण्याची गरज आहे त्या कृतीसाठी योग्य आहे. परंतु या "मर्यादेसहसुध्दा” ती असीम प्रेमाची पराकाष्ठा गाठते.

**विलिनीकरणानंतर, प्रवास दीर्घ होण्याचा नाही, तर मर्यादांच्या चौकटीत राहूनसुध्दा, सेवा करण्याचे अनंत मार्ग शोधण्याबद्दलचा आहे.**

या शिकवणीमुळे, आध्यात्मिक साधनेकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन बदलतो. असामान्य अनुभवांचा ध्यास सोडून, आपण दैनंदिन जीवनातील साध्यासुध्या गोष्टींमधील गहनता पाहण्यास शिकतो. भांडी धुताना वस्तूंच्या उत्क्रांतीबद्दलचे धडे मिळतात. महत्त्वाच्या गोष्टींचे आदान-प्रदान कसे करावयाचे हे श्वासोच्छवास दाखवतो. प्रत्येक वेळी कुणाशी संवाद साधताना, प्रेमाच्या प्रेरणेने सजग मर्यादा पाळण्याची संधी मिळते.

असीम असणे आपल्याला व्यापक स्वातंत्र्य देत नाही. पाणी जसे घन राहण्यासाठी बर्फ बनते, वर जाण्यासाठी वाफ बनते, किंवा द्रव राहून वाहते, तसेच हे आहे. प्रत्येक स्थिती परिपूर्णतेने काम करत असते आणि त्यांच्यातील बदल हे गरजेनुसार नैसर्गिकरित्या घडत असतात, लोक वर्तमान स्थितीविषयी नाखूष आहेत म्हणून नव्हे. कदाचित हेच खरे स्वातंत्र्य आहे.

**जीवन संदेश:** रोजचे काम करताना लक्षात ठेवा की तुम्ही सागर होण्यासाठी प्रयत्न करत नाही आहात. वर्तमान क्षणासाठी गरजेनुसार पाणी जसे राहते तसे पाण्यासारखे राहण्यासाठी तुम्ही शिकत आहात. पाणी पिताना, त्या हायड्रोजन आणि ऑक्सिजनचा विचार करा ज्यांनी अवघ्या जीवनाकरिता, स्वत:चे अस्तित्व सोडून दिले. जेव्हा तुम्हाला अडचणी येतात, तेव्हा पाण्यासारखे व्हा आणि असा मार्ग शोधा , ज्यायोगे केवळ स्वत:चीच नव्हे, तर सर्वांचीच गरज भागेल.

विलिनीकरणानंतरचा, प्रवास अधिक मिळवण्याचा नाही. जाणीवपूर्वक काही गोष्टींना जाऊ दिल्यानंतर, तुम्ही काय बनू शकता, स्वतःला मर्यादित ठेवूनही तुम्ही

**असीम असणे आपल्याला व्यापक स्वातंत्र्य देत नाही. पाणी जसे घन राहण्यासाठी बर्फ बनते, वर जाण्यासाठी वाफ बनते, किंवा द्रव राहून वाहते, तसेच हे आहे. प्रत्येक स्थिती परिपूर्णतेने काम करत असते आणि त्यांच्यातील बदल हे गरजेनुसार नैसर्गिकरित्या घडत असतात, लोक वर्तमान स्थितीविषयी नाखूष आहेत म्हणून नव्हे. कदाचित हेच खरे स्वातंत्र्य आहे.**

कशी सेवा करू शकता आणि तुम्ही अमूर्त अव्यक्त आहात हे जाणूनही, हे वर्तमान मर्यादित स्वरूप स्वीकारून, प्रेम कसे करू शकता हे शोधण्याबद्दलचा प्रवास आहे.

सर्व मार्गांच्या पलीकडचा हा मार्गहीन मार्ग आहे. मार्ग निर्माण करणे म्हणजे केवळ स्वतःवर स्वातंत्र्य लादणे होय. जेव्हा मार्गदर्शकांना, आत्मज्ञानानंतर काय, असे लोक विचारतात, ते फक्त एक स्मित देतात. ते तुम्हाला एक ग्लास पाणी देतात आणि तुम्ही सामान्यामध्ये अनंत, साध्यामध्ये गहन आणि पर्याप्ततेत सर्व काही, गरजपूर्तीत पूर्णत्व शोधण्याचा सार हे सर्व तुम्ही शोधावे याची ते वाट पाहतात.

आणि या आत्मबोधामध्ये एक अत्यंत विलक्षण बदल घडतो: सामान्य गोष्ट पवित्र, बनते असे नव्हे, तर तुम्हाला शेवटी समजते की हे शाश्वत होते. पाणी नेहमीच पवित्र होते. आपल्याला, फक्त हे कसे पाहावे, हे शिकणे आवश्यक होते.

पूज्य सद्गुरूंच्या चरणी प्रार्थना,
**कमलेश**

सामान्य गोष्ट पवित्र, बनते असे नव्हे, तर तुम्हाला शेवटी समजते की हे शाश्वत होते. पाणी नेहमीच पवित्र होते. आपल्याला, फक्त हे कसे पाहावे, हे शिकणे आवश्यक होते.

